# सेफ डिपॉझीट लॉकर्स नियमावली

१) लॉकर सुविधा ही व्यक्ति, फर्म, ट्रस्ट, कंपनी इ. खातेदारांना देता येईल.

२) अज्ञान व्यक्तीस लॉकर सुविधा देता येणार नाही.

३) लॉकर सुविधा मिळणेसाठी खातेदाराकडुन बँकेकडील विहीत नमुन्यातील अर्ज घेणेचा आहे.

४) लॉकर सुविधा सिंगल किंवा संयुक्त नावानेही देता येईल व त्यांची के.वाय.सी. करणे बंधनकारक राहील.

५) लॉकर धारक हा आपल्या बँकेचा ग्राहक करून घेणे आवश्यक आहे, तसेच त्याचे सेव्हींग किंवा करंट खाते असणे बंधनकारक आहे. सदर खातेवरून वार्षीक लॉकर भाडे वसुल करणेत येईल.

६) लॉकर वापरासाठी लॉकर धारकाच्या नमुना सह्या लॉकर अदा करतेवेळी घेणे आवश्यक राहील.

७) लॉकर धारकाकडुन बँक नमुन्यात करार करून घेणेत येईल.

८) लॉकर धारकाला अदा केलेले लॉकर उघडुन दाखवुन त्यामध्ये काहीही वस्तु नसलेची खात्री करून देणेत येईल व त्यानंतर त्यांचे समोर लॉकर बंद करून लॉकरची चावी अदा करून लॉकर त्यांचे ताब्यात देणेत येईल.

९) लॉकरची मास्टर चावी बँकेच्या ताब्यात राहील, तसेच कोणतेही लॉकर वापरणेसाठी संबधीत लॉकरधारकाकडील लॉकरची चावी व बँकेकडील मास्टर चावी या दोन्ही चाव्या एकाचवेळी लावल्याशिवाय ओपन करता येणार/होणार नाही.

१०) लॉकरमध्ये लॉकरधारक फक्त त्यांच्या मौल्यवान वस्तु, तसेच महत्वाची कागदपत्रे/दस्तऐवज ठेवु शकतील. लॉकरमध्ये रोख रक्कम, ज्वलनशिल पदार्थ, हत्यारे वगैरे ठेवता येणार नाही.

११) ज्या व्यक्तिच्या नांवे लॉकर अदा केले आहे, त्यांनीच लॉकर वापरणे बंधनकारक राहील, त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणासही लॉकर वापरता येणार नाही.

१२) लॉकर वापरताना लॉकर रूम मध्ये लॉकर धारकाव्यतिरिक्त इतर कोणाही व्यक्तीस सोबत प्रवेश करता येणार नाही.

१३) लॉकरचे वार्षीक भाडे रक्कम ही लॉकर साईज तसेच ग्रामीण/निमशहरी/शहरी/मेट्रो शहरातील शाखानुसार बँकेचे संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल त्यानुसार राहील, तसेच त्यामध्ये बदल करणेचा अधिकारही बँकेच्या संचालक मंडळासच राहील. तसेच थकित भाडेसाठी दंड रक्कम देखील वेळोवळी संचालक मंडळ ठरवेल त्यानुसारच राहील.

१४) वार्षीक लॉकरभाडे हे लॉकरधारकाकडुन सुरवातीसच 31 मार्च पर्यंतचे अँडव्हान्समध्ये भरून घेतले जाईल, त्यानंतर प्रत्येक आर्थिक वर्षाचे वार्षीक भाडे अँडव्हान्समध्ये वसुल केल जाईल. भरून घेतलेले भाडे कोणत्याही कारणाने परत करता येणार नाही. उदा. एक वर्षाचे आत लॉकर बंद केले तरीही.

१५) लॉकरधारकाकडून लॉकरची चावी हरवलेस तशी लॉकरधारकाकडुन लेखी सुचना घेवून नविन लॉकर चावी मिळणेबाबत लेखी अर्ज व इंडेमिनिटी बॉंड घेणेत येईल व त्यानंतरच संबधीत लॉकर कंपनीचा कर्मचारी, लॉकरधारक व बँक अधिकारी यांचे समक्ष लॉकर ब्रेक करून ओपन केले जाईल व संबधीत लॉकरधारकास नविन चावी अदा केली जाईल.

१६) लॉकर ब्रेक ओपन व नविन चावी अदा करणेसाठीचा खर्च संबधीत लॉकरधारकाकडून वसूल केला जाईल.

१७) बँकींग रेग्युलेशन अँक्ट 1949, सेक्शन 45 ZC ते 45ZF नुसार लॉकरसाठी नामनिर्देशन सुविधा राहील, परंतु सिंगल लॉकरधारक असेल तर एकाच व्यक्तिस नामनिर्देशित करता येईल, तसेच जॉईंट लॉकरधारक असतील तर दोन व्यक्तिस नामनिर्देशित करता येईल.

१८) लॉकर धारकास नामनिर्देशित व्यक्तीचे नांव कमी करता येईल किंवा बदलता देखील येईल.

१९) अज्ञानास ही निमनिर्देशित करता येईल, परंतु त्याचे अज्ञान पालक कर्ता म्हणून सज्ञानास नेमणे आवश्यक आहे.

२०) लॉकरधारक मयत झालेस नामनिर्देशित व्यक्तिने कायदेशिर वारस पुर्तता करून दिलेनंतर लॉकर ओपन करून लॉकरमधील वस्तू त्याच्या ताब्यात दिल्या जातील.

२१) नॉमिनेशन असलेल्या परंतु मोड ऑफ ऑपरेशन जॉईंट असलेल्या जॉईंट लॉकरधारकापैकी एक लॉकर धारक मयत झालेस, त्याचे मृत्युनंतर लॉकर वापरण्याचे किंवा लॉकरमधील वस्तु ताब्यात घेणेच अधिकार हे नामनिर्देशित व्यक्ति व जिवीत लॉकरधारक यांना जॉईंट राहतील. परंतु त्यापुर्वी लॉकरमधील वस्तुंची यादि तयार केली जावी आणि नामनिर्देशित व्यक्तिची व जिवीत लॉकरधारकाची त्यावरती सह्या घेणेत याव्यात. नॉमिनीने लॉकरमधील वस्तु काढल्यानंतर बँकेचे कोणतेही उत्तरदायीत्व राहणार नाही. (सेक्शन 45ZE)

२२) लॉकरधारक किंवा बँके व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस लॉकरवरती क्लेम करता येणार नाही किंवा नोटीस देता येणार नाही. अपवाद - सक्षम कार्यक्षेत्रातील कोर्ट ऑर्डर वगळता. (सेक्शन 45ZF)

२३) सिंगल व्यक्ति लॉकरधारक मयत झालेनंतर त्याची नॉमिनीस लॉकरमधील वस्तु काढता येतील, परंतु त्यापुर्वी लॉकर उघडणेबाबत कोणत्याही कोर्टाची ऑर्डर आहे किंवा नाही हे पाहणेत येईल.

२४) नामनिर्देशन नसलेल्या सिंगल लॉकर धारकाचे मृत्युंनतर त्याचे कायदेशिर वारसांची पुर्तता करून लॉकर उघडता येईल.

२५) नामनिर्देशन नसलेल्या परंतु मोड ऑफ ऑपरेशन जॉईंट असलेल्या जॉईंट लॉकरधारकापैकी एक लॉकर धारक मयत झालेस, त्याचे मृत्युनंतर लॉकर वापरण्याचे किंवा लॉकरमधील वस्तु ताब्यात घेणेचे अधिकार हे जिवीत लॉकरधारक व मयत लॉकरधारकाचे कायदेशिर वारस यांना जॉईंट राहतील. त्यापुर्वी लॉकरमधील वस्तुंची यादि तयार केली जावी आणि कायदेशिर वारस व जिवीत लॉकरधारकाची त्यावरती सह्या घेणेत याव्यात. कायदेशिर वारसाने लॉकरमधील वस्तु काढल्यानंतर बँकेचे कोणतेही उत्तरदायीत्व राहणार नाही.

२६) नॉमिनी किंवा कायदेशिर वारसास लॉकधारकाचे मृत्युनंतर तेच लॉकर वापरावयाचे असलेस त्यासाठी त्याचे वेगळे अँग्रीमेट व इतर आवश्यक त्या पुर्तता बँककडे करून देणे बंधनकारक राहील, परतु सदर नॉमिनी किंवा वारसास पुढे लॉकर अदा करणेचा अधिकार बँकेस राखीव राहील.

२७) लॉकरमधील वस्तुंची कोणतीही माहीती बँकेस नसते त्यामुळे लॉकरमधील वस्तुचा विमा उतरविला जात नाही, त्यामुळे लॉकरमधील वस्तु चोरी अथवा गहाळ झाल्यास बँक जबाबदार असणार नाही मात्र लॉकरची सुरक्षा करणेची जबाबदारी बँकेची राहील.

२८) शाखेने व्यावसायिक व्यवहार्यता लक्षात घेऊन लॉकर सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाईल.

२९) शाखेकडे लॉकर शिल्लक नसलेस नविन लॉकर मागणी साठी प्रतिक्षा यादि केली जाईल, तसेच प्रत्येक मागणी केलेल्या खातेदारास प्रतिक्षा यादितील नंबरसहीत पोहोच दिली जाईल.

३०) लॉकरधारकास किमान वर्षातुन एकदा तरी लॉकर ऑपरेट करणे बंधनकारक राहील, तसेच प्रत्येक महिन्यात पाच पेक्षा जास्त वेळा वापर होत असलेस सदरचे लॉकरची हाय रिस्क वर्गवारी करणेत येईल.

३१) एका वर्षामध्ये एकदाही लॉकर ऑपरेट न झालेस लॉकर धारकास लॉकर वापरणेबाबत किंवा सरेंडर करणेबाबत लेखी कळविणेत येईल. सदर लॉकरचे भाडे वसुल असलेस सदर लॉकर धारकाकडुन लॉकर न वापरणेबाबतचे लेखी कारण घेणेत यावे. सदरबाबत लॉकर धारकाकडुन कोणतेही लेखी कारण न मिळालेस तसेच लॉकरही ऑपरेट न केलेस लेखी नोटीस देवुन सक्तिने लॉकर ओपन करणेचा अधिकार बँकेस राहील.

३२) आपल्या बँकेची चावी ओळखण्यासाठी बँकेचा/शाखेचा कोड एम्बॉस करून चावी बँकेस बनवता येईल.

३३) लॉकरधारकाने त्याचे लॉकरच्या चावीची सुरक्षीतता व गोपनियता ठेवणे आवश्यक आहे. तसेच लॉकरधारकांस लॉकरची डुप्लीकेट चावी बनवता येणार नाही, त्यामुळे काही जबाबदारी निर्माण झालेस बँक जबाबदार राहणार नाही.

३४) रिझर्व्ह बँक किंवा संचालक मंडळाच्या सुचनेनुसार सदर नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करणेत येतील.

**लॉकर भाडे (वार्षीक)**

| अ. नं. | लॉकर साईज (मिलीमीटर) | ग्रामीण व निमशहरी | शहरी (सांगली, कोल्हापूर, सातारा) | मेट्रो (पुणे, मुंबई) |
|---|---|---|---|---|
| A | 115.5 x 180.5 x 503 | रू.800/- | रू.900/- | रू.1000/- |
| B | 115.5 x 361 x 503<br>115.5 x 271 x 503<br>148.50 x 216.5 x 503 | रू.1000/- | रू.1600/- | रू.2000/- |
| C | 265.5 x 361.5 x 503<br>148.5 x 434 x 503 | रू.2500/- | रू.2700/- | रू.3000/- |
| D | 318 x 434 x 503<br>179 x 542 x 503 | रू.3000/- | रू.3200/- | रू.3500/- |
| E | 395 x 542 x 503<br>375 x 542.5 x 503 | रू.3500/- | रू.4000/- | रू.4500/- |

1. ड्यु डेट नंतर लॉकर भाडे भरल्यास दरमहा रू.25/- दंड आकारणेत येईल.

वरीलप्रमाणे भाडे दर हे सध्याचे लॉकर धारकांसाठी वार्षिक भाडे ड्यु तारखेपासुन लागु राहतील, तसेच नविन लॉकर धारकांसाठी लॉकर अदा तारखेपासुन लागु होतील.